FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. 14/2019, वर्ष, दिनांक 19/03/1
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act ला.प्र.वि. भ्र.प्र.अधिनियम कलम-7 (सुधारणा-2018) कलमे Sections
(ii) अधिनियम Act ... कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार तारीख पासून 12/03/19 वेळ ..., तारीखे पर्यंत ..., वेळ ...
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 12/03/19, वेळ ...
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 32/19, तारीख 19/3/19 वेळ 17:05 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव बृहन्मुंबई महानगर पालिका "डी" वार्ड, नाना-चौक, मुंबई ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री. गौरव (b) वडीलाचे / पतीचे नाव अशोक पाठक
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 35 वर्षे, (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9322260271
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ..., जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता : 306/ ईरव बिल्डींग, बोरसाद लेन, गिरगाव मुंबई नंबर-04 गल्ली / सर्वे नं. घर / नाव नंबर फोन / मो. नंबर पॅन नं. वोटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ... गाव ... पोस्ट ... पो. स्टे. ...
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ... जिल्हा ... राज्य ... सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

प्रदीप अग्रवाल / क्लार्क 'डी' वार्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका वैद्यकिय आरोग्य विभाग.

क

श्री. गौरव अशोक पाठक हि. वय. 35 वर्षे,
धंदा- व्यवसाय, रा.ठि. 306/25, हेरंब
बिल्डींग, बोरभाट लेन, जे.एस.एस. रोड.
गिरगाव, मुंबई नं.04, यांचा स्वतंत्र पानावर
संगणकिकृत जबाब नोंद केला असून त्यास
नमुद गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात
येत आहे.

समक्ष

[signature]

[signature]

(विनोद साटले)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई.

जबाब दिनांक १९/०३/२०१९

श्री गौरव अशोक पाठक वय ३५ वर्षे, व्यवसाय– संगणक विक्री/खरेदी, रा.ठि. ३०६/२५,हेरब बिल्डीग, बोरभाट लेन, गिरगाव मुंबई ०४, फोन नं. ९३२२२६०२७१

---

मी वरीलप्रमाणे असून वरील पत्यावर जन्मापासून रहावयास आहे. सध्या माझेसोबत माझी पत्नी सौ. मनिता वय ३१ वर्षे व ०१ मुलगी नामे वृत्ती वय ७ वर्षे तसेच आई व वडील यांचेसह रहावयास आहे. माझा संगणक खरेदी व विक्रीचा व्यवसाय हा गेल्या १५ वर्षापासुन गुरूदेव कॉम्प्युटर्स, १० श्रीकृष्ण निवास, मगलवाडी,जे.एस.एस.रोड, गिरगाव मुंबई –४ येथे करीत असुन ,त्यातुन येणा–या उत्पन्नातुन माझ्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालतो.

माझे ओळखीचे व कौटुंबिक मित्र गिरगाव येथे राहणारे श्री.प्रविण दत्तात्रेय धोतरे वय ५८ वर्षे व श्रीमती प्रणया प्रविण धोतरे वय ५४ वर्षे यांना मुलबाळ नाही. म्हणुन त्यांनी त्यांचा सख्या लहान भाउ श्री. दिपक धातरे वय ५३ वर्षे यांची मुलगी नामे कन्नीका दिपक धोतरे वय १२ वर्षे हीला सन २००७ ला कायदेशीर परवानगीने दत्तक घेतली. तिचा जन्माचा दाखला बृहन्मुंबई महानगरपालीका ''डी'' वार्ड, नाना चौक, मुंबई येथुन घेतला होता. त्यानंतर श्री.प्रविण धोतरे हे कुटुबियासह सन २०१२ मध्ये उदयोगधंदयाकरीता वडोदरा, गुजरात राज्य येथे कायमस्वरूती रहावयास गेले. त्यापुर्वी श्री.प्रविण धोतरे यांनी दत्तक घेतलेल्या मुळ जन्म दाखल्यात नावात बदल करण्यासाठी दिनांक २९/०१/२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालीका डी वार्ड,या कार्यालयात अर्ज करून आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु त्यांना जन्म दाखलामध्ये बदल केलेली प्रमाणपत्र वेळेवर मिळाले नाही. म्हणुन श्री.प्रविण धोतरे हे गुजरात राज्य येथे रहावयास असल्याने मुलीचे जन्माचा दाखला मिळण्याकरीता व पाठपुरावा करणे शक्य नसल्याने त्यांनी मला सांगितले. म्हणुन मी महानगपालीका डी वार्ड येथे २ ते ३ वेळा श्री.अग्रवाल यांची भेट घेतली. त्यानंतर दिनांक ०५/०३/२०१९ रोजी श्री.अग्रवाल यांची प्रत्यक्ष भेट घेवुन श्री.धोतरे यांचे मुलीच्या जन्म दाखल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी माझेकडे रू.१५ ते २० हजार ची लाचेची मागणी केली. डी वार्डातील अधिकारी श्री अग्रवाल यांनी मागणी केलेली रक्कम मला देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १२/०३/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुबई येथे लेखी तक्रार दिली.

दि. १२/०३/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि पाटील यांचेकडे लोकसेवक अग्रवाल यांचेविरोधात लेखी तक्रार अर्ज दिला. सदर तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे दि. १२/०३/२०१९ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचाना ब्युरो कार्यालयात पाचारण केले. त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज वाचण्यास दिला व त्यानंतर अर्जावर पो.नि पाटील व पंचानी त्यांची स्वाक्षरी केली. मी दिलेल्या तक्रारीनुसार माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला असे सांगितले की, आपण प्रथम बृहन्मुंबई महानगरपालीका डी वार्ड, येथे जावुन प्रत्यक्ष भेटुन पडताळणी करून त्यांनतर लाचेची मागणी केल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले श्री. अग्रवाल व माझेमध्ये झालेले प्रत्यक्ष भेटीचे सभांषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

मी व पोलीस पथक हे सफेद रंगाच्या बोलेरो या पोलीस वाहनातुन फायर ब्रिगेड,नाना चौक येथे आलो तेथे आमचे वक्तव्य घेतले नंतर माझे शर्टाच्या आतील बनियनला व्हाईस रेकार्डर लावले व पंच श्री. खिस्ते यांचे सह मला बृहन्मुंबई महानगर पालीका 'डी' वार्ड येथे जाण्यास सांगितले असता, मी व पंच श्री. खिस्ते हे डी वार्ड येथे जावुन श्री.अग्रवाल यांना भेटलो असता त्यांनी दिलेले काम करून देतो उदया दिनांक १३/०३/२०१९ रोजी या असे सांगितले. त्यामुळे मी परत पंचासह फायर ब्रिगेड समोर नाना चौक येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनांजवळ पायी चालत आलो व पो.नि पाटील यांना घडलेल्या हकिकती बाबत सांगितले.

दि. १५/०३/२०१९ रोजी सापळा कारवाईसाठी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे येणे शक्य नसल्याचे सांगितले त्यावर सापळा पथक हे भाटीया हॉस्पीटल, मुंबई गेट क्र.२ व ३ च्या येथे बोलावुन माझे व पंच तसेच पो.नि पाटील यांचे वक्तव्य घेतले.

पो.नि पाटील यांनी मला सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालीका डी वार्ड मुंबई येथे जावे त्यावेळी तुमच्याबरोबर पंच श्री.खिस्ते हे तुमच्याबरोबर असतील. त्यावेळी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून हा माझे शर्टच्या आतील बाजुस बनियन लावण्यात आलेला होता. मी म.न.पा.डी वार्ड येथे श्री.अग्रवाल यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता, श्री अग्रवाल हे पहिल्या माळयावर भेटले त्यांची बर्थ सर्टीफिकेटच्या कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी श्री.अग्रवाल यांनी मला जन्माच्या दाखल्याबारबत फार्म भरण्यास सांगितले व फार्म भरून झालेवर सर्टीफिकेट घ्या." त्यानंतर श्री.अग्रवाल बोलले की , देवुन टाका ना काय असेल ते" पुर्ण केल्याबाबत खर्च करावा लागेल, त्यावेळी मी त्यांना किंती सांगीतले, त्यावेळी श्री. अग्रवाल याने दोन असे सांगितले असता, मी दोन हजार असे विचारले श्री.अग्रवाल यांनी होकार देवुन संमती दर्शविली व प्रमाणपत्र करीता प्रक्रिया करून पुन्हा त्याचेकडे येण्यास सांगितले.

त्यानंतर मी पपनस वाडी येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो व सापळा पथक यांना सविस्तर हकीकत सांगितली.डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंच व आम्ही ऐकले असता लोकसेवक अग्रवाल यांनी श्री.प्रविण धोतरे यांनी दत्तक घेतलेल्या मुलीच्या मुळ जन्म दाखल्यात नावात बदल करण्यासाठी रू.२०००/– ची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी माझेकडे लाचेकरीता मागणी केलेली रू.२०००/– दिले. त्यामध्ये रू.५००/– दराच्या ०३ नोटा, रू.२००/– दराच्या ०२ नोटा व रू.१००/– दराची एक नोट अशी दिली. लाचेच्या रक्कमेला कापसाच्या बोळयाने ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पो.नि.पाटील यांच्या सुचनेवरुन सदर भारतीय चलनी नोटांची घडी केलेला लिफाफा माझे शर्टच्या डाव्या खिशात अलगदपणे ठेवला व सुचना दिल्या. त्यानंतर पथकाने सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले.

म.न.पा.कार्यालयातील डी वार्ड कार्यालयातील श्री.अग्रवाल यांची पहिल्या माळयावर भेट घेतली असता श्री.अग्रवाल याने दुपारी मागणी केलेली लाचेची रक्कम माझा मित्र श्री.तेजस याचेकडे देण्यास सांगितले. परंतु तेजस हा कार्यालयातुन निघुन गेलेला होता.सदर दिवशी सापळा काढुन घेण्यात आला.

तरी बृहन्मुंबई महानगरपालीका डी वार्ड मधील वैद्यकीय आरोग्य विभाग येथे काम करीत असलेले लोकसेवक श्री.प्रदिप अग्रवाल याने माझेकडे माझा कौटुबिक मित्र श्री.प्रविण दत्तात्रेय धोतरे यांचे दत्तक घेतलेल्या मुलीच्या नावाच्या जन्म दाखल्याच्या नावात बंदल करण्याकरीता रू.२०००/–( दोन हजार रूपये) ची लाचेची मागणी केली म्हणुन माझी श्री. अग्रवाल यांचेविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष

(विनोद पाटील)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

19/03/2019

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादी कडुन.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक याने "फि" यांचा कौटुंबिक मित्र नामे श्री. प्रविण दत्तात्रेय घोतरे यांची दत्तक घेतलेल्या मुलीच्या मुळ जन्म दाखल्यात नावात बदल करण्यासाठी "फि" यांच्याकडे रु. 2000/- (दोन हजार) ची लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन भ्र.प्र. अधिनियम 1988 (सुधारणा-2018) चे कलम 7 अन्वये नमुद लोकसेवका-विरुद्ध गुन्हा नोंद आहे.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. विनोद सर्जेराव पाटील.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. .............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................ (3) Transferred to P.S ................................................, District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... विनोद स. पाटील
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**